Volume - 4 (2023)
Special Issue - 2 (April)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# महाराष्ट्राची अस्मिता.....!!!

# मराठी पाऊल पडते पुढे.....!!

**प्रा. डॉ. जयश्री संजय सातोकर**

प्रगती महिला कला महा. भंडारा

भ्रमणध्वनी क्र. ९४२०८६५४८३

Email Id - jayshreesatokar12@gmail.com

---

महाराष्ट्रावर निसर्गाने मुक्त हस्ताने उधळण केली आहे. भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक असा समृद्ध वारसा महाराष्ट्राला लाभला आहे. महाराष्ट्र विचारांची आणि संकल्पनांची भूमी आहे. महाराष्ट्रातील समाज जीवन हे विविधतेने नटलेले आहे. भारतातील इतर प्रदेशांपेक्षा महाराष्ट्राची प्रकृती मूलतः भिन्न आहे. वीरत्व आणि वैराग्य, रंगेलपणा आणि रगेलपणा इथे जोडीने नांदतो. अध्यात्म आणि विज्ञानाने महाराष्ट्राची पायाभरणी भक्कम झाली आहे. असा हा महाराष्ट्र मराठी माणसाच्या जिव्हाळ्याचा आणि अभिमानाचा विषय आहे . तर महाराष्टात बोलली जाणारी मराठी भाषा आस्थेचा विषय आहे. त्याचे सर्वांगीण जीवन हे मातृभाषेतून फुलते. कारण ती त्याच्या अंत:करणाची भाषा असते. अनेक भाषा मानवाला शिकता येतात. लिपी म्हणून त्या छान वापरताही येतात. परंतु हृदयाच्या प्रकटीकरण्यासाठी अशी अवगत केलेली भाषा धावून येत नाही. त्यासाठी आपल्या जिव्हाळ्याची, आपले पालन पोषण करणारी आपली मातृभाषाच महत्त्वाची ठरते. कारण तिच मानवाला त्याची खरी ओळख देते.

**महाराष्ट्राची अभिजात मराठी भाषा -**

1 मे 1960 रोजी महाराष्ट्र स्थापनेचा मंगल कलश यशवंतराव चव्हाण यांनी आणला. अधिकृत मराठी भाषिकांचे राज्य निर्माण करून ते आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार झाले .मराठी ही महाराष्ट्राची अधिकृत मुख्य भाषा झाली . मराठी बोलणारा माणूस तो महाराष्ट्रीयन अशी आज जगात त्याची ओळख आहे .याच मराठी भाषेने आज अभिजात भाषेचे सर्व निकष पूर्ण केले आहेत .अधिकृत घोषणा झाली नसली तरी ती अभिजात आहे हेच पूर्णतः खरे आहे .मराठी संस्कृती जिथे नांदली, बहरली, पोसल्या गेली; ज्या भूमीने मराठी साहित्याला जन्म दिला, संस्कार केले, जोपासले त्या महाराष्ट्राचे आणि मराठी भाषेचे नाते अतूट आहे. या भूमीच्या आणि भाषेच्या संस्कारावर जोपासलेल्या मराठी माणसाने जन्मभूमीचे आणि मातृभाषेचे ऋण मान्य करीत आपल्या सामर्थ्याने मराठी पाऊल पुढे टाकत अटकेपार झेंडा रोवला आहे. कोरोना या वैश्विक महामारीच्या काळात 2021 चे आभासी 'विश्व मराठी संमेलन' मोठ्या संख्येत ,उत्साहात संपन्न झाले .या संमेलनात फक्त महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण जगभरातील 12 कोटी मराठी माणसांचा समूह एकत्रित आला .मराठी साहित्य ,संस्कृती, युवा वर्गाचे स्वप्न यावर विचार विनिमय करू लागला. 2.30 कोटी मराठी माणूस महाराष्ट्रात आहे. 14 ते 15 कोटी लोकांची मातृभाषा मराठी आहे .या मराठी संमेलनात एकूण 35 हून अधिक देश सहभागी झाले होते . जगभरातील महाराष्ट्र मंडळे, सांस्कृतिक संस्था एका व्यासपीठावर आल्या. चाळीस-पन्नास प्रदेशातील एकत्र आलेले मराठी बांधव सक्षम, संपन्न आणि संपूर्ण अशा मराठी भाषिकांसाठी धडपडताना जगाने पाहिले. मराठी माणसाने जगभरातील मराठी माणसांचे संमेलन भरवून विश्वबंधुत्वाचे ज्ञानेश्वरादी संतांचे आणि केशवसुतांचे स्वप्न साकार केले.

**भविष्याचा वेध घेणारा मराठी माणूस -**

आज सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात मराठी माणसाने आपले पाय घट्ट रोवले आहेत. अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्र अनेक क्षेत्रात ऊजवा असल्याचे सिद्ध झाले आहे. उद्योगस्नेही राष्ट्र म्हणूनही या राज्याने आपली ओळख दृढ केली आहे. मराठी माणसाच्या कर्तृत्वाचा इतिहास कौतुकास्पदच नाही तर अनुकरणीय आहे. सह्याद्रीच्या कडे -कपारीतून 'हर हर महादेवचा' गजर करीत मर्द मराठा मावळ्यांनी इतिहास रचला आहे. स्वराज्याचे स्वप्न पाहणाऱ्या आणि ते पूर्णत्वास नेणाऱ्या स्वराज्य संस्थापिका मॉ जिजाऊ ह्या महाराष्ट्र कन्याच. दूरदृष्टी ठेवून परकीयांच्या गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी जिजाऊने शिवबा घडवला. छत्रपती शिवरायांनी प्रथमतः मराठी माणसांचे स्वराज्य स्थापन केले. वीररत्न बाजीप्रभू देशपांडे ,तानाजी मालुसरे, शिवबाला जीव लावणारे मावळे यांच्यासारख्या वीरांच्या तलवारी तळपल्या त्या याच महाराष्ट्रात . ब्रिटिशांविरुद्ध रणसिंग फुंकले गेले त्यात महाराष्ट्राचा वाटा मोठा आहे . लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी ब्रिटीशांच्या विरोधात झुंजार नेतृत्व देऊन असंतोषाची ज्योत पेटविली. गोपाळकृष्ण गोखले, गो.ग.आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर ,क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, उमाजीनाईक यांच्यासारख्या अनेक देशभक्तांनी देशासाठी प्राण पणाला लावले .राष्ट्रीय पातळीवरील सार्वजनिक विश्व साकारताना रानडे ,टिळक,गोखले, आगरकर ही नावं अस्सल मराठी होती . भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र पुढारलेला आहे; असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा त्या राज्यातील संतांचे योगदान, तर्कवादाची परंपरा या सोबतच सामाजिक सुधारणांसाठी मराठी माणसाने केलेले प्रयत्न, त्यात त्यांना मिळालेले यश, उद्योगासह अनेक क्षेत्रात घेतलेली झेप अशा अनेक कारणांचा अभ्यास केला जातो. महाराष्ट्रातील मराठी माणसाचे कर्तृत्व नजरेत भरणारे आहे . इतिहास -वर्तमान आणि भविष्याचा वेध घेण्याची ताकद मराठी माणसात आहे हे वारंवार सिद्ध झाले आहे .

संत निवृत्तीनाथांपासून ते तुकाराम -रामदासां पर्यंत आणि संत तुकडोजी महाराज ते गाडगेबाबा पर्यंतच्या मराठी संतांच्या मांदियाळीने महाराष्ट्र मनाचे संवर्धन व पोषण केले आहे. माणुसकीची प्रभावी परंपरा सांगितली आहे. क्रांती निर्माण करणारे परिवर्तनवादी साहित्य संतांनी लिहिले आहे, यावरच मराठी माणसाचा पिंड पोसल्या गेला आहे. मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणण्यासाठी प्रयत्न करणारे एस.एम.जोशी,आचार्य प्र.के.अत्रे,श्रीपाद अमृत डांगे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह अनेक जण नवमहाराष्ट्रासाठी एकत्र आले .महात्मा जोतीराव फुले ,क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले ,छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, कर्मवीर शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या अनेक समाजसुधारकांनी सामाजिक समानतेच्या चळवळीसाठी उचललेले पाऊल हे परिवर्तनशील आहे. वासुदेव, गोंधळी, शाहीर, बखरकार या माय मराठीच्या निष्ठावंत साधकांनी हा मराठी माणसांचा महाराष्ट्र घडवला आणि जनसामान्यांपर्यंत पोहचविला . म्हणूनच कवी गोविंदाग्रज म्हणतात ,

**"भावभक्तिच्या देशा आणिक बुद्धीच्या देशा**
**प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा ॥"**

**उत्कृष्ट कामगिरीच्या क्षेत्रात महाराष्ट्राचा दिल्लीत झेंडा -**

संत नामदेवांनी मराठी भाषेचा झेंडा महाराष्ट्राबाहेर फडकवला. सोलापूरच्या रणजीतसिंह डिसले या शिक्षकाने सात कोटींचा ग्लोबल टीचर पुरस्कार मिळवून सातासमुद्रापलीकडे मराठी पताका रोवली. लंडन,

ऑस्ट्रेलिया, कैलिफोर्निया, सॅन होजे, अमेरिका, शिकागो, सिडनी, दुबई अशा अनेक ठिकाणी आज महाराष्ट्र मंडळे कार्यरत आहेत. संगणकाच्या क्रांतीत ज्यांचा सिंहाचा वाटा आहे ते पद्मभूषण संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर , वैज्ञानिक डॉ. रघुनाथ माशेलकर , डॉ. जयंत नारळीकर ,मराठी भाषाशास्त्रज्ञ डॉ. अशोक केळकर , इस्रोची मुहूर्तमेढ रोवणारे भारतीय अंतराळ संशोधकाचे जनक डॉ. विक्रम साराभाई , ज्यांनी भारतीय चित्रपट सृष्टी जन्माला घातली ते दादासाहेब फाळके ,100 शतक काढून जागतिक विक्रम करणारा सचिन तेंडुलकर, शासकीय सेवेत राहूनही मराठीतील अन्यायाविरुद्धचा आवाज बुलंद करणारे पद्मभूषण डॉ . वि .भी .कोलते ,जिल्हा व तालुका पातळीवर न्यायालयाचे मराठीकरण करणारे श्री. शांताराम दातार, दशसहस्त्रेषु वक्ता राम शेवाळकर, शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आणि यासारख्या अनेक मराठी मानसांनी केलेले कार्य म्हणजे मराठी पाऊल पडते पुढे याची साक्ष देणारेच आहे .

आजही केंद्राच्या ठिकाणी सचिवालयात अनेक मराठी माणसे कार्यरत आहेत . अभिनयाच्या क्षेत्रात माधुरी दीक्षित, उर्मिला मातोंडकर पासून रोहिणी हट्टंगडी ते मुक्ता बर्वे, स्मिता पाटिल, डॉ. श्रीराम लागू यासारख्या अनेकांनी केलेली कामगिरी ही नजरेत भरणारी आहे .व्यवसाय क्षेत्रात मसाला किंग दातार, चितळे बंधू ब्रँड सर्वपरिचित आहे . राष्ट्रीय महिला क्रिकेट संघाची फलंदाज पूनम राऊत, गोलंदाज शिखा पांडे यांनी घेतलेली भरारी उत्तुंग आहे . संगीतकार अजय-अतुल , दिग्दर्शक नागराज मंजुळे ,भारताच्या संरक्षण मंत्री पदापर्यंत मजल मारणारे शरद पवार, पहिली महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, अनाथांची माय सिंधुताई सपकाळ, लोकबिरादरी डॉ . प्रकाश आमटे आणि त्यांची पुढची पिढी, आनंदवनकार बाबा आमटे, पद्मश्री प्राप्त डॉ. अभय बंग , डॉ . राणी बंग यासारख्या अनेक मराठी माणसांनी आपल्या प्रतिभेच्या व कार्यकर्तृत्वाच्या जोरावर पुढे टाकलेले पाऊल मराठी माणसांसाठी अभिमानाची बाब आहे .

महाकवी सुधाकर गायधनी यांना युरोपमधील इटली देशातील वर्ल्ड युनियन ऑफ पोएट्स या जागतिक साहित्य संस्थेने या वर्षीचा 'सिलव्हर क्रॉस फॉर कल्चर: वर्ल्ड मेडल' हा युरोपातील अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार घोषित केला आहे. या संस्थेचे जगभरात 15 लाख सदस्य आहेत . त्यांचा 'देवदूत' या महाकाव्याचे इटालियन भाषेत अनुवाद झाले आहे . इतकेच नव्हे तर युरोपातील साहित्याला वाहिलेले प्रसिद्ध मासिक कॉन्टॅक्ट इंटरनॅशनल या मासिकाने या वेळचा विशेषांक सुधाकर गायधनी यांच्या कवितेला समर्पित करून त्यांना 'लॉरेट-द- ग्रेट इंडियन इपिक पोएट' या विशेषणाने गौरवांकित केले आहे. देशातील प्रगत राज्य असा लौकिक असलेल्या महाराष्ट्राने स्टार्टअप, खनिज कर्म आणि पशुसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत केंद्र सरकारचे तीन पुरस्कार पटकावले आहेत. एकाच महिन्यात मिळालेल्या तीन पुरस्काराने महाराष्ट्राचा सन्मान दिल्लीत वाढला आहे.

केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी योजनेत जास्तीत जास्त उद्योजकांना प्रेरित करण्यासाठी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. राज्याचे पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी पुरस्कार स्वीकारला. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या देशातील 75 व्यक्ती व संस्थांमध्ये महाराष्ट्रातील 20 व्यक्ती व संस्थांचा समावेश आहे. केंद्रीय उद्योग खात्याच्या 'स्टार्टअप रँकिंग' मध्ये महाराष्ट्राने 'टॉप परफॉर्मन्स' पुरस्कार पटकावून या क्षेत्रातील आघाडीवर सिक्कामोर्तब केले. मान्यताप्राप्त स्टार्टअप मध्ये महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर आहे. देशातील एकूण 72 हजार 702 मान्यताप प्राप्त

स्टार्टअप पैकी 13 हजार 450 'स्टार्टअप' महाराष्ट्रातील आहेत हे येथे उल्लेखणीय आहे. खनिज क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी महाराष्ट्राला राष्ट्रीय खनिज पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले.12 जुलैला दिल्लीत झालेल्या खाण व खनिज संमेलनात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते व खनिज कर्म मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या उपस्थितीत महाराष्ट्राला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्याच्या उद्योग विभागाचे अप्पर मुख्य सचिव बलदेव सिंग यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

**मराठी महिलांची गरूड झेप -**

महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या प्रतिभेला एकही विषय वर्ज्य नाही . त्यात महिलाही मागे नाहीत . विज्ञान,तंत्रज्ञान, कला या सर्व अंगांनी मराठी मन विकसीत झाले आहे. मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर या शहरातून औद्योगिक वसाहती वाढल्या आहेत. कोकणातील आंबा,काजू, मासे हवाबंद करून परदेशात पाठविले जातात. लिज्जत पापडाचा व्यवसाय करणारी ज्योती नाईक आज सर्वपरिचित आहे. 'स्वादुपिंडाचा कर्करोग' विषयाचा अभ्यास करून भारत सरकार पद्मश्री पुरस्कार प्राप्त लीला बोरगावकर, यकृत दान करणारी जुही पवार, पोलिसांना शवविच्छेदन करून मदत करणाऱ्या डॉक्टर वसुधा पाटील, शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या मनीषा म्हैसकर, नीला सत्यनारायण, राजकारणात स्वतःला झोकून देणाऱ्या मृणाल गोरे, करंदीकर, लोकसभेच्या सभापती सुनीता महाजन, गुप्तहेर रजनी पंडित, प्रथम आधार कार्ड धारक महिला रंजना सोनवणे ,नेमबाज अंजली भागवत, प्रवास वर्णन लेखिका डॉ. मीना प्रभू, महिला वैज्ञानिक सौदामिनी देशमुख, अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या आणि प्रसंगी प्रेत उचलणाऱ्या रेल्वे पोलीस शिपाई नयना धुळेकर, अग्नि दलातील महिला अभियंता पदावर कार्यरत हर्षिली ताम्हेकर,स्त्रियांच्या न्याय्य हक्कासाठी संसदेत लढणाऱ्या दुर्गाबाई देशमुख, एव्हरेस्ट सर करणारी चिमुरडी क्रिष्णा पाटील, कुष्ठरोग्यांना जवळ करणाऱ्या साधनाताई आमटे, आदिवासींना जवळ करणाऱ्या आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मंदाताई आमटे, भारताच्या अंटार्टिका मोहिमेवर जे संशोधक पथक गेलं त्यात सहभागी मराठी महिला आदिती पंत , जगभर प्रवास करणारी उज्वला पाटील, आजही संपूर्ण जगावर सुरांची मोहिनी घालणाऱ्या लता दीदी, आशा दीदी, पहिली महिला रेल्वे इंजिन चालक रेखा भोसले ,शिक्षणतज्ज्ञ डॉ. ताराबाई मोडक, स्त्री शिक्षणाच्या कार्य करणाऱ्या रमाबाई रानडे, स्त्री शिक्षणाचा पाया घालणाऱ्या मातृतुल्य क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, पहिली महिला डॉ. आनंदीबाई जोशी, रखमाबाई राऊत, राणी लक्ष्मीबाईंची शौर्यगाथा, अहिल्याबाई होळकरांचे राजकारण यासारख्या अनेक महिलांनी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात केलेली कामगिरी नेत्रदीपक आहे.

सावित्रीबाई फुले, अनुताई वाघ या थोर स्त्रियांनी शिक्षणासाठी आयुष्य वेचले. 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ', 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ (सोलापूर)', 'बहिणाबाई चौधरी विद्यापीठ (जळगाव)' आणि 'श्रीमती नाथीभाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई' (राज्यभर कार्यकक्षा) अशा थोर, पराक्रमी, समाजसेवी, साहित्यिक स्त्रियांची नावे शिक्षण संस्थांना दिली आहेत. आजही मेधा पाटकर देशपातळीवर प्रश्न मांडतात दिसतात.

**महाराष्ट्र नर रत्नांची खाण -**

शृंगार गीतापासून हिंदी चित्रपट विश्वात कौटुंबिक आशयाची लोकप्रिय व दर्जेदार गीते रचणारे संगीतकार राम लक्ष्मण हे मूळचे नागपूरचे. मराठी चित्रपट सृष्टीचे गाणं विश्व समृद्ध आणि श्रीमंत करणारे जगदीश खेबुडकर कोल्हापूरचे तर ऑस्कर पर्यंत गेलेला राष्ट्रीय सुवर्णकमळ विजेता 'श्वास' चित्रपटाच्या लेखिका माधवी

घारपुरे मूळच्या डोंबिवलीच्या. शुद्ध मराठी वातावरणात जन्माला येऊन आंतरराष्ट्रीय क्षितिजावर आपल्या बौद्धिक कर्तृत्वाने तळपणारे विसाव्या शतकातील लखलखता तारा म्हणजे चिंतामणराव द्वारकानाथ उर्फ सी .डी .देशमुख. संस्कृत पंडित ,वनस्पतीशास्त्र ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ज्ञ आणि कुशल प्रकाशक अशा अनंत आघाड्यावर सी.डी. आपल्या बुद्धी कौशल्याने तळपले . शासकीय, प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक व्यवस्थेला चेहरा मोहरा प्रदान करणाऱ्या सी . डी. ना अख्ख जग विसरू शकत नाही .परखडपणे व्यक्त होणारे कॉमरेड गोविंद पानसरे, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यात प्राणाची आहूती देणारे नरेंद्र दाभोळकर, श्याम मानव, डॉ.श्रीराम लागू ,नाटककार विद्याधर गोखले , विव्दतरत्न डॉ. भाऊजी दप्तरी , डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. देशपांडे, डॉ.श्री.भा.वर्णेकर, बनहट्टी, वि. भि. कोलते, श्रीपादकृष्ण, वामनराव जोशी, नाना जोग, पु.भा. भावे, दारव्हेकर, विद्याधर गोखले, महेश एलकुंचवार या सारख्या नर रत्नांनी मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले आहे. महाराष्टाची गुणाढ्य संस्कृत साहित्यिकांची परंपरा, सांस्कृतिक , साहित्यिक व नाट्य परंपरा निश्चितच उज्ज्वल आहे .

राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विजेतेपद पटकावणाऱ्या नंदू नाटेकर या सांगलीच्या मराठमोळ्या गडीने बॅडमिंटनमध्ये कारकीर्द घडवून ऑल इंडिया स्पर्धेत पराक्रम दाखविणारे दुसरे आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकणारे पहिले बॅडमिंटनपटू म्हणून ठसा उमटविला . सोलापूर जिल्ह्यातील सांगोलीचे महाराष्ट्राच्या राजकारणातील भीष्माचार्य शेकापचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार भाई डॉ.गणपतराव देशमुख यांनी रोजगार हमीवर पुरूष आणि महिलांना समान मजुरी मिळावी म्हणून विधानमंडळात आकाशपाताळ केले. दि.बा. पाटील, केशवराव धोंडगे, उद्धवराव पाटील अशा अनेक प्रज्ञावंत मराठी माणसांनी केलेले कार्य विसरता येणे शक्य नाही, एकविसाव्या शतकातही सॉफ्टवेअरच्या क्षेत्रात मराठी युवक अग्रेसर आहे. महाराष्ट्राने आपले नाव सदैव सार्थ ठरवले आहे. मराठी माणूस आजही साऱ्या जगात आपल्या बौद्धिक कौशल्याने नावाजला जात आहे. सिरोंच्या सारख्या अतिदुर्गम तालुक्यातील नक्षलग्रस्त भागात तेलगु विद्यार्थ्यांना मराठी भाषेची गोडी लावणारे शिक्षक खुर्शिद शेख आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील उमेश खोसे यांना केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार घोषित होतो .अमरावती जिल्ह्यातील लक्ष्मण दिल्लीत चहा विकून लिखाणाची गोडी सांभाळतो. त्यांच्या पुस्तकाची कीर्ती राष्ट्रपती भवनापर्यंत पोहोचते. त्यांचे ग्रंथ आणि कादंबऱ्या आजही फ्लिपकार्ट, स्नॅपडील, ॲमेझॉन, शॉप क्लूज, डेली हंट, पेटीएम, किंडलवर विक्रिस आहेत. जगभर त्यांची ग्रंथसंपदा पसरली आहे .

नवी पिढी सक्रीय होण्याची परंपरा महाराष्ट्रात अखंड सुरू आहे. अरण्यऋषी मारोती चितमपल्ली यांचे पक्षिकोश मराठीतील पक्षांचा विकिपीडिया ठरणार आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर सयाजीरावांचा वारसा कृतीत आणणाऱ्या यशवंतरावांनी 19 नोव्हेंबर 1960 रोजी 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ' स्थापन केले. अशा प्रकारची संस्था स्थापन करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य होते. या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनाचे कार्य झाले. मराठी भाषेतील पहिले सर्वात मोठे प्रकाशक म्हणून दामोदर सावळाराम यंदे यांना मान आहे. मराठी साहित्य, समाज, संस्कृतींचे आधुनिकीकरण करण्यासाठी ज्या प्रकाशकांचा मुख्य वाटा आहे त्यामध्ये यंदे हे सूत्रधाराच्या भूमिकेत आहेत. नुकतेच 2014 ते 2020 या सात वर्षात आपल्या कर्तृत्वाने समाजापुढे आदर्श ठेवणाऱ्या स्त्रियांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा आढावा घेणारा

'लोकसत्ता नवदुर्गा' पुस्तक प्रकाशन सोहळा गाजला. तरुणाईच्या सर्जनशीलतेला, जिद्दीला दाद देणाऱ्या 'लोकसत्ता तरुण तेजांकित' उपक्रमाचे पर्व वेगळी वाट चोखाळत यशाची शिखर गाठणाऱ्या विविध क्षेत्रातील तरुणांचा परिचय करून देतो. दै. वृत्तपत्रांच्या माध्यमातून अटकेपार दमदार कार्य करणाऱ्या तरुणाईची यशोगाथा जनसामान्यांपर्यंत पोहचत असल्याने, नव्या पिढीला ते प्रोत्साहित करते.

देशसेवेतही मराठी पाऊल पुढेच असल्याचे सातारा तालुक्याच्या पश्चिमेला वसलेल्या दरे या गावाने सिद्ध केले आहे. 204 उंबऱ्याचे सुमारे 850 लोकसंख्येच्या या गावाला सैनिकी परंपरा लाभली आहे. गावातील अनेकांनी सैन्यात सेवा केली असून अनेक तरूण आजही देशसेवेचे कर्तव्य बजावत आहेत. साहित्य,कला, शिक्षण, क्रीडा, संस्कृती, नाट्य, चित्रपट, संगीत, सहकार, कृषी, उद्योग, संगणक, विज्ञान अशा विविध क्षेत्रात मराठी माणसाने पुढाकार घेऊन केलेली वाटचाल जगात कौतुकाचा विषय झाला आहे. आजही सेंद्रिय शेतमालाच्या उत्पादनात महाराष्ट्राने देशात दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. चंद्रावर, मंगळावर माणसाचे पाऊल पडले आहे. उद्या मराठी माणसाने तिथेही संमेलने साजरी केली तर आश्चर्य वाटायला नको. जगाच्या पाठीवर कुठेही मराठी माणूस असेल तरी तो अभिमानाने मराठी मातीचा टिळा कपाळी लावतो. म्हणूनच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात महाराष्ट्राला महाराष्ट्र गीत देणारे प्रसिद्ध गीतकार राजा बढे, मोठ्या अभिमानाने **'जय जय महाराष्ट्र माझा'** हे स्फूर्ती गीत लिहिताना म्हणतात,

**" दिल्लीचेही तक्त राखतो महाराष्ट्र माझा "**

मराठी माणसाचे पाऊल अटकेपार झेंडा रोवण्यात ना कधी थांबले ना कधी थांबणार.......!

**निष्कर्ष -**

- महाराष्ट्र मराठी माणसाच्या जिव्हाळयाचा आणि अभिमानाचा विषय आहे.
- मराठी माणसाच्या कर्तृत्वाचा इतिहास कौतुकास्पदच नाही तर अनुकरणीय आहे.
- इतिहास, वर्तमान आणि भविष्याचा वेध घेण्याची ताकद मराठी माणसात आहे.
- महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या प्रतिभेला कुठलाच विषय वर्ज्य नाही.
- विज्ञान, तंत्रज्ञान, कला, साहित्य या सर्व अंगाने मराठी मन विकसित झाले आहे.
- शासकीय, प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक व्यवस्थेला चेहरा-मोहरा प्रदान करण्यात महाराष्ट्रीयन अग्रेसर आहेत.
- जगाच्या पाठीवर कुठेही मराठी माणूस असला तरी तो अभिमानाने मराठी मातीचा टिळा कपाळी लावतो.
- नवी पिढी सक्रिय होण्याची परंपरा महाराष्ट्रात अखंड सुरू आहे.
- सामाजिक सांस्कृतिक राजकीय क्षेत्रात मराठी माणसाने आपले पाय घट्ट रोवले आहे.
- अध्यात्म आणि विज्ञानाने महाराष्ट्राची पायाभरणी भक्कम केली आहे.

**संदर्भ -**

- दै. लोकसत्ता, दै. सकाळ, दै. देशोन्नती,
- दै. लोकमत वर्तमानपत्र